# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर..

परिपत्रक क्र.कोविमं/माध्य. दि. ३१ऑगस्ट २०१८ (जा०क्र ४४०५)

## माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जुलै/ऑगस्ट २०१८ परीक्षेच्या निकालानंतरच्या छायांकित प्रती व गुणपडताळणी संदर्भात महत्वाच्या सूचना

१) या परिपत्रका सोबत संकेत स्थळावर दिलेल्या अर्जाच्या नमूनयात योग्य त्या ठिकाणी टीका करुन छायांकित प्रत अथवा गुणपडताळणी साठी अर्ज करण्यात यावा.सोबत ऑनलाईन निकालाची प्रत मिळावी .

२) छायांकित प्रती शुल्क प्रत्येक विषयासाठी रु.४००/- व गुणपडताळणी शुल्क प्रत्येक विषयासाठी रु.५०/- प्रमाणे आहे .

**३) माध्यमिक शाळाप्रमुखांनी/वितरण केंद्रप्रमुखांनी छायांकित प्रती मिळणेबाबतचे अर्ज स्विकारावयाचे नसून अर्ज थेट मंडळाकडे पाठवावयाचे आहे याची नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची मागणी मंडळाकडे दि. ३०. ०८.२०१८ ते १८.०९ .२०१८ पर्यंत करता येईल.तसेच गुणपडताळणीचे अर्ज दि.३०. ०८.२०१८ ते ०८.०९ .२०१८ पर्यंत करता येतील .**

४) माध्यमिक शाळाप्रमुखांनी गुणपडताळणीचे परिपूर्ण भरलेले अर्ज परस्पर मंडळाकडे न पाठविता अर्ज एकत्रित करुन यापूर्वी पुरविलेल्या बँक ऑफ इंडीयाच्या चलनाद्वारे रक्कम भरणा करावी.(चलन रिसीट कोड नं.०७ आहे.) व दिनांक १०.०९.२०१८ रोजी एकाच टप्प्यात जिल्हा वितरण केंद्रावर जमा करावेत.

**५)वितरण केंद्रप्रमुखानी शाळांकडून प्राप्त गुणपडताळणीचे अर्ज दि.१०.०९.२०१८ रोजी स्विकारून दि.११.०९.२०१८ रोजी मंडळात जमा करावेत**

**६)दि. ०८.०९.२०१८ नंतरचे गुणपडताळणी अर्ज व दि.१०.०९ .२०१८ नंतरचे चलन स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

### जिल्हानिहाय वितरण केंद्राची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | यशवंत हायस्कूल , कराड | ०९ | कन्या प्रशाला, कवठेमहांकाळ, जि. सांगली |
| २ | मुधोजी हायस्कूल व ज्यू. कॉलेज, फलटण, जि.सातारा | १० | हिज हायनेस राजा चिंतामणराव पटवर्धन हायस्कूल, गणेश दूर्ग, सांगली |
| ३ | अनंत इंग्लिश स्कूल, सातारा | ११ | स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर, तासगांव, जि.सांगली |
| ४ | भारती विद्यापीठाचे डॉ.जे.डब्ल्यू. आयर्न अकॅडमी, भूविकास बँकेजवळ, सातारा | १२ | यशवंत हायस्कूल, इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली |
| ५ | कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय,भुईंज ता. वाई | १३ | गोविंदराव माळी हायस्कूल, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर |
| ६ | श्री भवानी विद्यालय व आबासाहेब खेबुडकर ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स,आटपाडी,जि.सांगली | १४ | जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर, जयसिंगपूर, ता. शिरोळ जि.कोल्हापूर |
| ७ | जत हायस्कूल, जत, ता.जत, जि. सांगली | १५ | श्री शाहुकुमार भवन (हायस्कूल), कासारवाडा पो. तुरंबे |
| ८ | अभिजीत कदम प्रशाला, अमरापूर,ता.कडेगांव, | १६ | कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर (करवीर,गगणबावडा,पन्हाळा,कागल व शाहूवाडी तालूके ) |

**१. मार्च २०१९ च्या परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी छायांकित प्रती/ गुणपडताळणीच्या निर्णयाची वाट न पाहता मंडळाने नियोजित केलेल्या तारखांना आवेदनपत्रे भरणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र तारीख दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी व विद्यार्थ्यांना तसे कळवावे.**

२. सर्व माध्यमिक शाळाप्रमुखांनी विद्यार्थ्यांचे अर्ज पाठविताना विद्यार्थ्यांनी योग्य ती फी भरलेली आहे किंवा नाही हे तपासणे आवश्यक आहे. माध्य. शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या छायाकिंत प्रती व गुणपडताळणी नंतर गुणांमध्ये बदल झालेल्या गुणपत्रिका विद्यार्थ्यांनी मंडळा कडून गुण बदलाचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीत बदलून घ्याव्यात. या कालावधीनंतर गुणपत्रिका बदलून नेण्यासाठी यणाऱ्या विद्यार्थ्यास प्रती महिना रु.१००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. अशी गुणपत्रिका तीन वर्षापर्यंत बदलून दिली जाईल. तद्नंतर दंड भरुनही गुणपत्रिका बदलून देता येणार नाही. विद्यार्थ्याने संबंधित शाळेच्या पत्रासोबत मूळ गुणपत्रिका सादर केल्यानंतरच सुधारित गुणपत्रिका देण्यात येईल. मूळ गुणप्रत्रिका सोबत नसलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही .

***टीप : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या (इ.१० वी) निकालानंतर ज्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती मिळणेबाबत विहित शुल्क भरून अर्ज केला आहे अशा प्रकरणात भरलेले शुल्क विद्यार्थ्यास कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही याची नोंद घेवून सदरबाब सर्व विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या निदर्शनास आणावी.***

गुणपडताळणी अर्ज,/उत्तरपत्रिका छायाप्रत मिळणेचा अर्ज पुनर्मुल्यांकन करणेसाठीचा अर्ज व शिक्षकांचा अभिप्राय नमुना फॉर्म इ. मंडळाच्या **www.sscboardkolhapur.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति,

मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, सातारा/सांगली/कोल्हापूर.